।। सा विद्या या विमुक्तये ।।

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

जनसंपर्क कार्यालय (PUBLIC RELATIONS OFFICE)

Phone: (02462) 229325 Website: www.srtmun.ac.in E-mail: srtmunpro1@gmail.com


संदर्भ क्र.: ज.का./२०२०-२१/ १० दि.१५/०४/२०२१

## 'स्वारातीम' विद्यापीठांतर्गत हिवाळी-२०२० परीक्षा लॉकडाऊनमुळे पुढे ढकलण्यात आल्या

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठांतर्गत सध्या हिवाळी-२०२० च्या परीक्षा चालू झाल्या होत्या. महाराष्ट्र शासनाने लॉकडाऊनचा निर्णय घेतल्यामुळे १२ एप्रिल आणि १५ एप्रिल पासून सुरु झालेल्या सर्व परीक्षा पुढे ढकलण्यात आलेल्या आहेत. ५ मे नंतर सुधारित वेळापत्रक जाहीर करून त्यानुसार पुढील परीक्षा घेण्यात येतील.

कोव्हीड-१९ विषाणूच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे शासनाने कडक निर्बंध लावून संचारबंदी लागू केली आहे. यामुळे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. उद्धव भोसले यांनी परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे. विविध अभ्यासक्रमाच्या हिवाळी-२०२० परीक्षा ६ एप्रिल पासून सुरू झालेल्या आहेत. व्यावसायिक व अव्यावसायिक अभ्यासक्रमाच्या या वेळापत्रकानुसार एक दोन विषयाचे जे पेपर शिल्लक आहेत. केवळ त्याच शिल्लक राहिलेल्या विषय पेपरच्या परीक्षा होणार आहेत. पण पदवी, पदव्युत्तर अथवा क्लस्टर परीक्षा व्यावसायिक व अव्यावसायिक अभ्यासक्रमामधील ज्या परीक्षा १२ एप्रिल पासून सुरू झाल्या व १५ एप्रिलपासून सुरू होणार होत्या त्या सर्व परीक्षा पुढे ढकलण्यात आलेल्या आहेत. याबाबतीत सुधारित वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर ५ मे नंतर जाहीर करण्यात येईल व त्यानुसार पुढील परीक्षा घेण्यात येतील, असे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्र-संचालक डॉ. वसंत भोसले यांनी कळविले आहे.

---

प्रति,
मा. संपादक/ जिल्हा प्रतिनिधी,
दैनिक/इलेक्ट्रॉनिक मेडिया/सामाजिक संपर्क माध्यम,
सप्रेम नमस्कार,
मान्यवर/ महोदय,
उपरोक्त बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिद्धीस देऊन सहकार्य करावे, ही नम्र विनंती.
आपला विश्वासू,

जनसंपर्क अधिकारी,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,
ज्ञानतीर्थ, विष्णुपुरी, नांदेड - ४३१ ६०६.